जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद कोल्हापूर
पत्ता - जुनी प्रशासकिय इमारत नागाळा पार्क कोल्हापूर
फोन नंबर - (०२३१) २६५१०४४,
ई मेल आयडी - nbakolhapur@gmail.com

जा.क्र.जिपको/DWSM/कावि- मविशा-१ /9e /२०१७ दिनांक:98 /०९/२०१७

वाचा - १)केंद्र शासनाकडील राजपत्र दि.२/७/२०११ चे राजपत्र .
२)महाराष्ट्र शासनाकडील राजपत्र - दि.३,मार्च २००६पर्यावरण विभाग,मंत्रालय मुंबई .
३) केंद्र शासनाकडील प्लास्टीक कचरा व्यवस्थापन नियम २०१६, दि.१८ मार्च २०१६

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.२ शासन राजपत्राची प्रत सुलभ संदर्भासाठी या पत्रासोबत देत आहोत.राज्यातील प्लास्टिक पिशव्या वापर व उत्पादनाबाबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने हा शासन आदेश लागू केला आहे.

१) संदर्भिय अध्यादेशातील कलम क्रं.३(दोन)(ग) नुसार संबंधित ग्राम पंचायतींनी प्लॅस्टिक कॅरी बॅग्ज वापर , हाताळणी व उत्पादन या बाबतची अंमलबजावणी करणेची आहे.आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व गावांचे क्षेत्रात या अधिनियमाची अंमलबजावणी सर्व ग्राम पंचायतीने करणेची आहे.
२) अधिनियमातील कलम ४ नुसार कोणताही विक्रेता,अन्नपदार्थ साठविण्यासाठी,वाहून नेण्यासाठी किंवा आवेष्ठनासाठी पुर्नचक्रित प्लास्टिकपासून बनविलेल्या पिशव्यांचा /पात्रांचा वापर करता येणार नाही.
३) अधिनियामातील कलम ८ (१) नुसार प्लॅस्टिक कॅरी बॅग्ज पिशव्यांच्या जाडीबाबत सुचित केले असून पिशव्यांची किमान जाडी ५० मायक्रॉन पेक्षा कमी आणि आकार ८ X १२ इंचापेक्षा कमी असणार नाही.
४) अधिनियमातील कलम ८(२) नुसार कलम ८(१)अन्वये ज्या पिशव्यांचा आकार ८ X १२ पेक्षा कमी असेल आणि जाडी,पोटनियम १ मध्ये निर्दिष्ठ केलेल्य किमान जाडीपेक्षा कमी असेल अशा पिशव्यांची निर्मिती,संग्रह,वितरण आणि विक्री करता येणार नाही.
५) दुकानदारांनी ५० मायक्रॉन पेक्षा जास्त आणि आकार ८ X १२ इंचापेक्षा जास्त असलेल्या पिशव्या विक्रीसाठी ठेवणेसाठी ग्रामपंचायतीकडे नोंदणी शुल्क किमान रु.४८,०००/- पेक्षा जास्त भरुन नोंदणी करणे आवश्यक आहे.अशा प्रकारे नोंदणी न करता पिशव्या दुकानदारांनी विक्रीसाठी ठेवलेचे आढळुन आलेस ग्रामपंचायतीने किमान मासिक दंड रु.४०००/- पेक्षा जास्त आकारणी करणे आवश्यक आहे.या दंडाच्या रकमेबाबतचा ठराव दि.०२ आक्टोंबर २०१७ रोजीच्या ग्रामसेभध्ये घेणेत यावा.
६) दि.२० सप्टेंबर २०१७ पर्यंत वरील प्रमाणे सर्व गावामध्ये दवंडी देवुन तसेच गावातील सर्व दुकानदार,खाद्यपदार्थ विक्रते यांना ग्रामपंचायतीमार्फत नोटीस देवुन सर्व दुकानदारानां ग्रामपंचायतीकडे नोंदणी करणेबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.
७) गावातील सर्व दुकानदार,खाद्यपदार्थ विक्रते यांना सुरवातीला ग्रामपंचायतीमार्फत कापडी पिशव्यांचे वाटप करावे.
८) दि.०२ आक्टोंबर २०१७ पासुन याबाबतची कडक अंमलबजावणी करण्यात यावी.
९) प्रत्येक ग्रामपंचायती सरपंच व ग्रामसेवक यांचेवरती प्लास्टीक पिशवी वापर बंदी बाबतची प्रभावी अंमलबजाणी करणेबाबतची जबाबदारी द्यावी.

१०) तालुकास्तरावरती गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली माहे सप्टेंबर २०१७ पुर्वी प्लास्टिक निर्मुलन सनियंत्रण समिती पुढीलप्रमाणे गठीत करावी.

| | | |
|---|---|---|
| गट विकास अधिकारी | - | अध्यक्ष |
| उपअभियंता(ग्रापापु) | - | सदस्य |
| विस्तार अधिकारी(पंचायत) | - | सदस्य |
| विस्तार अधिकारी(आरोग्य) | - | सदस्य |
| विस्तार अधिकारी(IRDP) | - | सदस्य |
| तालुका आरोग्य अधिकारी | - | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे समिती स्थापन करुन तात्काळ अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.वरीलप्रमाणे गठीत केलेल्या समिती मार्फत महिण्यामध्ये किमान १०ग्रामपंचायतीमधील सर्व दुकानदार व खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या दुकानावरती धाडी टाकुन मुद्या क्र.५ नुसार दंडात्मक कार्यवाही करणेबाबत ग्रामसेवकांना सुचित करावे.

११) नोंदणी शुल्क व दंड स्वरुपात जमा झालेली रक्कम प्लास्टीक उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता वापरण्याबाबत ग्रामपंचायतींना सुचित करावे.

या नियमांची अंमलबजावणी आपल्या क्षेत्रात प्रभावीपणे करणेची आहे.तसेच या अधिनियमाची अंमलबजावणी करणेचे अधिकार गावस्तरावर सरपंच व ग्रामसेवक यांना राहतील. याबाबत प्रभावी अंमलबजावणी करणेची जबाबदारी गट विकास अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रामध्ये उपअभियंता(ग्रापापु) यांनी सादर करावा.

Shermas
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,कोल्हापूर

Shoumeka
अध्यक्ष,
जिल्हा परिषद,कोल्हापूर

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,--------------------------(सर्व)

पंचायत समिती------------------------

मासिक अहवाल सादर करावयाचे प्रपत्र,माहे-----------२०१

| अ.क्र. | ग्रा.प. संख्या | ठराव केलेल्या ग्रा.प.ची संख्या | ग्रामपंचायतीकडे नोंदणी शुल्क भरुन नोंदणी केलेली संख्या | सनियंत्रण समिती मार्फत धाडी टाकलेल्या ग्रा.प. | दंड वसुल केलेल्या दुकानदार/खाद्यविक्रेत्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती---------------

उपअभियंता(ग्रापापु)
पंचायत समिती---------------

गट विकास अधिकारी
पंचायत समिती---------------